## पुणे महानगरपालिका प्रशासनाकडील शिपाई (वर्ग-४) पदासाठी भरती कार्यवाही

१) जाहिरात दि.०१/०७/२००८ व दि.२९/०७/२००८ (दै.आज का आनंद व द.कातिब)

२) सेवायोजन कार्यालय, जिल्हा पुनर्वसन कार्यालय (प्रकल्प ग्रस्त) यांच्या कडून यादी मागविण्यात आली.

३) एकूण प्राप्त अर्ज - ४३३८

४) पात्र अर्ज - ३०९७

५) अपात्र अर्ज - १२४१

**मे.राज्य शासन, सामान्य प्रशासन, शासन निर्णय क्र.एसआरव्ही-२००४/प्र.क्र.१२/०४/बारा, दि.७ जून २००४ चे मान्य धोरणानुसार पात्र उमेदवारांच्या लेखी परिक्षा व तोंडी परिक्षा घेण्यात आल्या.**

६) सर्व पात्र ३०९७ उमेदवारांच्या दि.०४/०१/२००९ रोजी ७५ गुणांची लेखी परिक्षा घेण्याचे ठरले. सर्व पात्र ३०९७ उमेदवारांना लेखी परिक्षेसाठी पत्रे पाठविण्यांत आली होती.त्यापैकी २६२१ उपस्थित उमेदवारांच्या लेखी परिक्षा घेण्यांत आल्या.

७) लेखी परिक्षेचा निकाल दि.०४/०१/२००९ रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत त्या त्या परिक्षा केंद्रावर जाहिर करण्यात आला.

८) उमेदवारांना लेखी परिक्षेत प्राप्त झालेल्या गुणानुसार गुणवत्ता यादी तयार करण्यात आली व सदर गुणवत्ता यादीनुसार रिक्त पदे, आरक्षण, अनुशेष, समांतर आरक्षण, नजिकच्या काळात रिक्त होणारी पदे यांचा विचार करुन १:३ या प्रमाणात एकुण ४५० उमेदवारांच्या २५ गुणांची तोंडी मुलाखती दि.०६, ०७, ०९ फेब्रुवारी २००९ रोजी मा.सेवक निवड समितीमार्फत घेण्यात आल्या. मुलाखतीस एकुण ४२८ उमेदवार उपस्थित होते व २२ उमेदवार अनुपस्थित होते.

९) लेखी परिक्षेत मिळालेले गुण व तोंडी परिक्षेत मिळालेले गुण एकत्रित करुन रिक्त पदे, आरक्षण, अनुशेष, समांतर आरक्षण, नजिकच्या काळात रिक्त होणारी पदे यांचा विचार करुन ९२ पदांसाठी निवडयादी व ५६ पदांसाठी प्रतिक्षायादी तयार करुन अंतिम मान्यतेसाठी मा.मुख्य सभा पुणे महानगरपालिका यांचेकडे सादर करण्यात आली आहे.